| | |
|---|---|
| MHBI140025972018 | दाखल दिनांक : १७ / १२ / २०१८<br>नोंदणी दिनांक : १७ / १२ / २०१८<br>निकाल दिनांक : ११ / ०५ / २०२६<br>कालावधी : व. ०७ म. ०४ दिवस २४ |

**भाग 'अ'**

**आष्टी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट क्र.३)**
**ता.आष्टी, जि.बीड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : महेश आर. बडाख)**
(न्यायनिर्णय : दिनांक ११/०५/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.२२६/२०१८ निशाणी क्र.४७/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : २२८/२०१८
पोलीस ठाणे : आष्टी, ता.आष्टी, जि.बीड.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे आष्टी,<br>ता.आष्टी, जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | **श्री.सी.ए.जावळे/श्री.व्ही.एस.गव्हाळे** |
| **आरोपी** | **उमेश अशोक मूरकूटे,**<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती, |
| | **संतोष विजय सुरवसे,**<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>दोघे रा. वडारगल्ली आष्टी, ता.आष्टी, जि.बीड. |
| आरोपीचे विधीज्ञ | **श्री.बी.बी. अनारसे** |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४/०७/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल | १८/०७/२०१८ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १७/१२/२०१८ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १७/०१/२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १३/०३/२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | ११/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा कालावधी लागु असल्यास | --- |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमेश अशोक मूरकूटे | कलम ४१ अ प्रमाणे नोटिस | - | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २ | संतोष विजय सुरवसे | कलम ४१ अ प्रमाणे नोटिस | - | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

**भाग 'क'**

**अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार**

| अ.सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १ | सोपान काशिनाथ धोंडे | ३४ | घटनास्थळ पंच |
| २ | राहुल दिगांबर खुळपे | ४१ | जप्ती पंच |
| ३ | बबन बाजीराव लष्कर | ४३ | साक्षीदार |

**आरोपीतर्फे साक्षीदार**

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| – | – | – |

### न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | ३५ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | ४२ | जप्ती पंचनाम्यावरील पंचांची सही |

### मान्य केलेली कागदपत्रे

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

### आरोपीतर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

### न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

### मुद्देमालाचा तपशील

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | एम.आर.क्र.११५/२०१८ | सोनी कंपनीची डी.व्ही.डी. कॅसेट |
| २ | एम.आर.क्र.१४९/२०१८ | उजव्या पायाचा ९ नंबरचा कापडी बुट |

## न्यायनिर्णय

## (दिनांक ११/०५/२०२६)

आरोपी क्र. १ व २ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम

३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधासाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे–**

**०२.** फिर्यादी नवनाथ बाळकृष्ण सायकड याने फिर्याद दिली की, दिनांक १४/०७/२०१८ रोजी ६.३० वाजण्याच्या दरम्यान शिवाजी चौकातुन घरी जात असता, समोरुन आरोपी क्र. १ व २ यांनी त्यांची मोटारसायकल थांबवली व ते विठ्ठल तोडकरशी बोलत होते. ते आरोपींना आम्हाला अर्जंट जायचे आहे असे म्हणाले असता, आरोपी क्र. २ ने शिवीगाळ केली असता ते गाडीवरुन खाली उतरले तेव्हा आरोपी क्र. २ ने त्यांच्या तोंडात चापट मारली व खाली पाडले त्यामुळे त्यांच्या डोक्याला मार लागला. आरोपी क्र. २ ने त्यांना लाथाबुक्क्याने तोंडावर, पाठीवर, डाव्या बरगडीवर पायाच्या बुटाने मारहाण केली व जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या तोंडावर व बरगडीला मार लागला. त्यांच्या नाकातोंडातुन रक्त निघुन ते बेशुध्द झाले. त्यानंतर त्यांना त्यांचे आई व भाउ सरकारी दवाखाना आष्टी येथे उपचारकामी घेऊन गेले, पुढे अ.नगर येथे सी.टी. केअर हॉस्पीटल येथे औषध उपचार केला. तेथे नाकाचे ऑपरेशन व बरगड्या फॅक्चर झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सबब प्रस्तुतची फिर्याद आहे.

**०३.** फिर्यादवरुन पोलीस ठाणे आष्टी येथे गु.र.क्र. २२८/२०१८ नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास, तपास अधिकारी बी.ए. जायभाये, पोलिस ठाणे आष्टी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन, साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवले, जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र व इतर कागदोपत्री

पुरावा हस्तगत केला. तपासाअंती आरोपीविरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र/अंतीम अहवाल दाखल केला.

**०४.** पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.१९) निश्चित करण्यात आला. आरोपीने त्याचे निवेदन (नि.क्र.२० व २१) अन्वये गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**०५.** अभियोगपक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये आरोपीचे विरुध्द अपायकारक पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०६.** अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** या सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष त्याखाली नमुद कारणांकरीता नोंदविले आहेत :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी पायातील बुटाचा हत्यार म्हणुन वापर करुन फिर्यादीस मारुन ईच्छापुर्वक जखमी केले ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी फिर्यादी लाथाबुक्याने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादी व साक्षीदार यांना शांतता भंग घडवुन आणण्याच्या उददेशाने अपमानीत करुन शिवीगाळ केली ? | |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना जीवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **<u>का र ण मि मां सा</u>** ::

**<u>मुद्दे क्र.१ ते ४ करीता</u>** :

**०८.** मुद्दा क्र.१ ते ४ एकमेकांशी संलग्न असलेने त्यांची कारणे एकत्र नोंदविण्यात येत आहेत. अभियोग पक्षाने आरोपींच्या विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता वर भाग 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे ३ साक्षीदारांना तपासले आहे.

**०९.** आरोपींच्या विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपीने बेकायदेशीररित्या फिर्यादीस गाडीवर बसलेला असतांना शिवीगाळ करुन त्यांच्या तोंडावर चापट मारुन खाली पाडले व पायातील बुटाने मारुन त्यास जखमी करुन जीवे मारण्याची धमकी दिली हे देखील अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे. नि. ३१ वरील अहवालानुसार फिर्यादी मयत असल्याने तसेच अभियोगपक्षाने इतर साक्षीदार न तपासल्याने त्यांचा पुरावा बंद करण्यात आला.

**१०.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ सोपान काशिनाथ धोंडे हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. दुसरे पंच शेख हजर होते. घटनास्थळ

जायभाय यांनी दाखवले. घटनास्थळी भांडणे झाली होती. घटनास्थळाच्या पुर्वेस– शनी मंदिराचा रस्ता, पश्चिमेस– किनारा चौक, उत्तरेस– दुकाने व दक्षिणेस– महात्मा फुले चौक असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्यासमक्ष नि. ३५ प्रमाणे पंचनामा झाल्याचे सांगीतले.

**११.** सा.क्र. २ राहुल खुळपे व सा.क्र. ३ बबन लष्कर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. तसेच त्यांना पंचनाम्यासाठी पोलीसांनी बोलावले नव्हते. तसेच त्या मधील मजकुर माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने त्यांना अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १५४ प्रमाणे उलटतपास सदृश प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यातुन देखील अभियोगपक्ष आरोपीविरुध्द कोणतीही अपायकारक बाब अभिलेखावर आणण्यास अपयशी ठरला आहे.

**१२.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने फिर्यादी, तपासी अधिकारी व इतर स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. अ.सा.क्र. २ व ३ हे जप्तीपंच व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. सा.क्र. १ सोपान यांनी त्यांच्या उलटतपासात तपासी अधिकाऱ्यासोबत ओळख असल्यामुळे त्याने पंचनाम्यावर सही केली असल्याचे तसेच पंचनाम्यातील मजकुराबाबत त्यांना माहित नसल्याचे सांगीतले. तसेच फिर्यादी यांची साक्ष न नोंदविल्याने फिर्याद व घटनास्थळ पंचनामा शाबीत करण्यात आलेला नाही. अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही

सबळ पुरावा दिसुन येत नाही.

**१३.** प्राप्त परिस्थितीत उपलब्ध पुराव्याचे एकंदर अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हयामध्ये गोवण्याइतपत कुठलीही बाब न्यायालयासमोर आलेली नाही. त्यामुळे आरोपींनी बुटाने फिर्यादीस मारहाण करुन, मारुन ईच्छापुर्वक जखमी केले तसेच, त्यांना शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे सिध्द होत नाही. अभियोगपक्षाला भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ चे आवश्यक घटक सिध्द करण्यात पुर्णपणे अपयश आल्याचे दिसुन येते. सबब, मुद्दा क्रं.१ ते ४ चे निष्कर्ष “नकारार्थी” नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्र.५ साठी</u>:–**

**१४.** मुद्दे क्र. १ ते ४ चा निष्कर्ष पाहता, अभियोगपक्ष आरोपी विरुध्द आरोप शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. आरोपी गैरहजर आहेत. आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र असल्याने त्यांच्या गैरहजेरीत न्यायनिर्णय देण्यात येतो. जप्त मुद्देमाल सोनी कंपनीची डी.व्ही.डी. कॅसेट व बुट मूल्यहिन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर त्याची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी. करीता, मुद्दा क्र.५ च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत :–

:: **<u>आदेश</u>** ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ व २ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष |

| | |
|---|---|
| | मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व एक जामीनदार दयावा. |
| ४. | जप्त मुद्देमाल सोनी कंपनीची डी.व्ही.डी. कॅसेट व बुट अपिल कालावधी संपल्यानंतर त्याची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर) |

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.11 18:10:58 +0530

( महेश आर. बडाख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), आष्टी

ठिकाण – आष्टी
दिनांक – ११/०५/२०२६

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 11/05/2026
Transcribed on : 11/05/2026
Checked & signed on : 11/05/2026

**Sd/-**
Anant S. Deshmukh,
(Stenographer Grade III)